**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यात ५८ मतदारसंघांमधे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८ टक्के मतदान
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल येत्या सोमवारी ऑनलाइन जाहीर होणार
- पुणे पोर्शे अपघात प्रकरणी, चालकाचं अपहरण केल्याबद्दल अल्पवयीन आरोपीच्या आजोबाला अटक, २८ मेपर्यंत पोलीस कोठडी /डोंबिवली एमआयडीसी स्फोट प्रकरणी कंपनीचा मालक मलय मेहता याला २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी
- दक्षिण कोरियात झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं पटकावलं सुवर्ण पदक

**आणि**

- येत्या ३१ तारखेपर्यंत कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता /कोकण किनारपट्टीवरचं सर्व प्रकारचं जलपर्यटन उद्यापासून ३१ ऑगस्ट पर्यंत बंद

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी आज देशातल्या सहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या ५८ मतदारसंघांमधे संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८ टक्के मतदान झालं. उत्तर प्रदेशातल्या १४, हरियाणातल्या सर्व १०, पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये प्रत्येकी आठ, दिल्लीत सर्व ७, ओदिशामधल्या सहा, झारखंडमधल्या ४ आणि जम्मू काश्मीरमधल्या एका मतदारसंघासाठी हे मतदान झालं.

यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक **७८** टक्के इतकं मतदान झालं आहे.

**इतर राज्यांमधलं मतदान असं आहे...**

झारखंड अंदाजे **६१** टक्के

उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये प्रत्येकी **५२** टक्क्यांपेक्षा जास्त

हरियाणामध्ये **५६** टक्के

जम्मू काश्मीरमध्ये **५१** टक्क्यांपेक्षा जास्त

दिल्लीमध्ये **५४** टक्के

ओदिशामध्ये **५९** टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं आहे.

या टप्प्यात भाजपाचे ज्येष्ठ नेते धर्मेंद्र प्रधान, मनोहरलाल खट्टर, मनेका गांधी, मनोज तिवारी, तसंच काँग्रेसचे नेते दीपेंदर सिंह हुड्डा, कुमारी शैलजा, राज बब्बर आणि कन्हैय्या कुमार, जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती, समाजवादी पार्टीचे नेते धर्मेंद्र यादव यांच्यासह ८८९ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रात बंद झालं.

**<><><><><>**

राज्यातील मतदान प्रक्रिया संपूर्णपणे शांततेत आणि सुरळीत झाल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. मतदान प्रक्रिया बाधित होत आहे असे दाखवणारे आणि ईव्हीएममध्ये छेडछाडीचा प्रयत्न होत असल्याचे दाखवणारे इतर राज्यांमधले काही जुने व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे प्रसारित केले जात असल्याचं निदर्शनाला आलं असून हे व्हिडिओ राज्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ शी संबंधित नसल्याचं निवडणूक कार्यालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

निवडणूक म्हणजे लोकशाहीतला मोठा उत्सव आणि भावी पिढ्यांच्या मनात लोकशाहीची मूल्यं रुजवण्याची एक संधी असल्याचं प्रधानमंत्री आणि भाजपाचे

ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डीडी न्यूजला दिलेल्या मुलाखतीत ते आज बोलत होते. सरकार किंवा राजकीय पक्षांनी त्यांच्या कामाचा हिशेब जनतेला द्यावा, असं मत त्यांनी व्यक्त केलं. निवडणूक म्हणजे लोकांना भेटण्याची एक प्रकारची संधी आहे असं मी मानतो. कोणत्याही प्रकारची टीका आपण गांभीर्यानं घेतो असंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळानं मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल २७ मे, म्हणजे येत्या सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर केला जाणार आहे.

मंडळाच्या maha **h** sscboard.in या संकेतस्थळावर हा निकाल विद्यार्थ्यांना पाहता येईल. गुणपडताळणीसाठी आणि गुणपत्रिकेच्या छायाप्रतींसाठी २८ मे २०२४ ते ११ जून २०२४ या काळात मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनं अर्ज सादर करता येतील.

**<><><><><>**

कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरणी अटक करण्यात आलेल्या अल्पवयीन आरोपीचे आजोबा सुरेंद्रकुमार अग्रवाल याला न्यायालयानं २८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. गाडीच्या चालकावर गुन्हा स्वतःवर घेण्यासाठी दबाव आणल्याचा आणि त्याचं अपहरण करून डांबून ठेवल्याचा आरोप सुरेंद्रकुमार याच्यावर आहे. गुन्हे शाखेनं आज त्याला अटक करून न्यायालयात हजर केलं. या अपघातप्रकरणी आत्तापर्यंत तीन गुन्हे दाखल झाले आहेत आणि सात जणांना अटक करण्यात आली आहे.

याप्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अगरवाल याच्यासह अन्य पाच जणांना ७ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात नियमांचं उल्लंघन केल्यामुळे दोन पोलिसांना निलंबित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

डोंबिवली एमआयडीसीत अमूदान कंपनी मध्ये झालेल्या स्फोट प्रकरणात कंपनीचा मालक मलय मेहता याला आज कल्याण न्यायालयात हजर करण्यात आलं असता न्यायालयानं त्याला २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी त्याला काल अटक केली होती. या प्रकरणात मध्यस्थी याचिका प्रियेश सिंग यांनी दाखल केली असून त्यांच्याकडून आकाश बोईनवाड यांनी युक्तिवाद करत, वाढलेल्या उष्णतेमुळे हा स्फोट झाल्याचा दावा केला आहे.

**<><><><><>**

अहमदनगरच्या जिल्हा न्यायालयाच्या ओसाड परिसरात हिरवाई फुलवणारे मुख्य जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्ड यांचा अहमदनगर बार असोसिएशनकडून निसर्गश्रीमंत न्यायाधीश पुरस्कारानं गौरव करण्यात येणार आहे. ११ जून रोजी हा सोहळा पार पडेल.

**<><><><><>**

दक्षिण कोरियामध्ये झालेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिला संघानं सुवर्ण पदक जिंकलं आहे. ज्योती सुरेखा वेन्नम, परनीत कौर आणि आदिती स्वामी यांच्या संघानं तुर्कीएच्या संघाला अंतिम सामन्यात पराभूत केलं. दरम्यान, ज्योती आणि प्रियांश यांना मिश्र दुहेरीत अमेरिकेच्या ऑलिव्हिया डीन आणि सॉयर सुलियन यांच्याकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

<><><><>

विको कंपनीचे अध्यक्ष यशवंतराव पेंढारकर यांच्या पार्थिवावर आज सकाळी नागपूरच्या अंबाझरी घाट इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल नागपुरात वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झालं. २०१६ पासून त्यांनी विको कंपनीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. त्यांच्या नेतृत्वात कंपनीनं कालसुसंगत बदल स्वीकारत प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले. त्यांच्याच कार्यकाळात कंपनीला इकॉनॉमिक टाइम्सचा २०२३ या वर्षाचा ‘ब्रँड ऑफ द इअर’ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला होता.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात अंतिम सामना होणार आहे. चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना होईल.

<><><><>

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत, दोन वेळा ऑलिम्पिक पदकाला गवसणी घालणाऱ्या भारताच्या पी. व्ही. सिंधूनं थायलंडच्या बुसानन ओंगबामरूंगफान हिचा १३-२१, २१-१६, २१-१२ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात तिचा मुकाबला सातव्या मानांकित चीनच्या वॅन्ग झी यी हिच्याशी होणार आहे.

<><><><>

नैऋत्य मोसमी पावसाच्या, पुढच्या वाटचालीसाठी बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य, मध्य आणि ईशान्य भागात अनुकूल परिस्थिती आहे. ईशान्य, मध्य प्रदेश

आणि लगतच्या भागातील चक्रीय स्थिती आता विदर्भ आणि लगतच्या भागात आहे.

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, तर कोकण मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित वाढ झाली. येत्या ३१ तारखेपर्यंत कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची, तर येत्या बुधवारपर्यंत विदर्भात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं कोकण किनारपट्टीवरचं सर्व प्रकारचं जलपर्यटन २६ मे ते ३१ ऑगस्ट या कालावधीत बंद राहणार आहे. बंदर आणि पर्यटन विभागानं हा आदेश जारी केला आहे.

दरम्यान, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वेंगुर्ले बंदरात गुरुवारी रात्री होडी उलटून सात खलाशी समुद्रात फेकले गेले होते. त्यातल्या चार खलाशांचा बुडून मृत्यू झाला होता तर तीनजण वाचले होते.

**<><><><><>**

पुण्यात आज व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग यांनी व्हाईस ॲडमिरल अजय कोच्चर यांच्याकडून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या कमांडंट पदाची सूत्र स्विकारली. खडकवासला राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी असलेल्या सिंग यांनी किनारपट्टी तसंच सागरी अशा दोन्ही विभागात सेवा बजावताना आयएनएस रणजित आणि आयएनएस प्रहारच्या माध्यमातून कर्तृत्व गाजवलं आहे. आयएनएस ब्रम्हपुत्रा, आयएनएस शिवालिक आणि आयएनएस कोची या युद्धनौकांवरही ते कार्यरत होते.